Panavatha




# '...चल ग बायजाबाई!'

'ए सखू, आटप लवकर. अग बघ जमल्या सगळ्याजणी. तो काय भीमाक्काचा हसण्याचा आवाज येतोय! हे इकडं रंग्याला माझ्याजवळ.'

'आलो गं नर्मदा.' वस्तीवरच्या सगळ्याजणी रात्री एकत्र जमतात. जेवण खाणं आटोपून घटकाभर एकत्र यायचं, कधी नर्मदाच्या ओटीवर तर कधी सारजाच्या मागच्या परसात सगळ्याजणी बसतात.

'सखू, आवडाबाई भेटली की नाही?'

'नाही. का?'

'अग, शिवबाला आपण चांगलं झाडलं म्हणून मलाच शिव्या द्यायला लागली.'

'बर कां भीमाक्का. आपल्या विहिरीजवळ किती डबकी झालीत पाहिलीस ना? आणि शाळंसमोर आणि गावभर सगळीकडं!'

'तर आम्हाला परवा शेतावर जाताना शिवबा भेटलं ते ग्रामपंचायतीचं सभासद नाहीत का? आपणच की मत दिलं त्यांना. म्हणून त्यांना आम्ही सांगितलं. विहिरीजवळ पाणी साठतं तिथं फरशी टाका नाहीतर वाळू टाका.'

'आणि, गावातल्या डबक्यामुळं डास कडाकडा अंग फोडतात, आता पावसाळा संपला. डीडीटी मारा तिथं.'

'त्यांना म्हटलं ग्रामपंचायतीला मिळतं. सरकार देतं आमच्यासाठी तर येऊद्यात आमच्यापोतर. तुम्ही गडप करू नका.'

'डासानी तापाची साथ येती. औषधाला सारखे पैसे द्यायला काय पैशाची झाडं हायती कां घरात?'

'म्हणून सखू म्हणाली आठ दिवसाच्या आत विहिरीजवळ वाळू आणि डबक्याजवळ डीडीटी मारलेली दिसली पाहिजे.'

'म्हणून त्यांना सगळ्यांनी झाडलं तर त्याची बायको आवडाबाई आम्हाला शिव्या द्यायला लागली. तिला जसं डास चावत नाहीत आणि विहिरीवर तिला अत्तराचाच वास येतो.'

'आवडाबाईचंच कशाला आपण नव्हतो का आधी भांडत. मग दररोज अशा एकत्र जमायला लागलो तेव्हा कमी झालीत भांडणं आपली. पोटातली दुःख ओठावर आली, एकमेकीला कळली की बरं असत.'

'हो ना माझ्या रजनीचं लग्न कसं घाईत ठरलं– आपण सगळ्या होतो म्हणून आठ दिवसात लग्न उभं राहिलं.'

'पण एक सांगू भीमाक्का, एक काम मात्र फक्कड झालं. पोरं संभाळायचं. तुझ्याजवळ पोरं ठेऊन जातो तर बिनधास काम करता येतं. तुझी शिस्त पण रहाती. नाहीतर शेतावर पोरांना घेऊन जायचं– तिथं त्यांनी हे तोंड ते तोंड कर, मग मालकाची वाटेल तशी बोलणी ऐकून घे. तुला बी या वयात कोसभर लांबच्या शेतात कामाला यायला नको.'

'ए मालकावरून आठवलं, आपल्या किसन पाटलाला एकदा सरळ करायला हवा.'

'किसन पाटील म्हणजे ट्रॅक्टर घेऊन गावभर हिंडतो तोच नं? तुम्ही कामाला जाता तो?'

'त्याचं काय झालं?'

'त्याचं बारीक लक्ष असतं. तरी परवा नर्मदाला म्हणतो तू कडब्याची पेंड नेलीस तुझं आठवड्यातलं पैसं कापून घेणार. तिनं घेतली -पण नव्हती पेंड. आम्हाला म्हणतो तुमचं काम भरत नाही.'

'कुठं दमदाटी कर. एखाद्या बाईची मजुरी काप असले चाळे चाललेत त्याचं. बाकीचे शेतमालक कधी बाईकडे नजर उचलून बघणार नाहीत.'

'तर हा टोळभैरव कुठं विहिरीच्या बाजूला एकट्या बाईला बोलव नाहीतर बाया दिसल्या की गाणंच म्हण असला चहाटळपणा करतो. याबद्दलही त्याला सरळ करायचाच पण मजुरी विनाकारण कापतो त्याबद्दल पण– दमबाजी तर गड्यांना पण करतो. बायांचं जाऊच देत.'

'आणि मात्रशे, शेतावर हातभट्टी तर सतत चालू असती.'

'नर्मदाचा दादला तिथूनच आणतो बाटली.

'ए आता पीत नाही. एकादवारीच घेतो! आपण सगळ्यांनी त्याला बोलल्यापासून घाबरतो प्यायला. पण किसन पाटलाचं मात्र बघायचाच.'

'वा ग वा बघायचं? तो म्हणाला कामावर येऊ नका तर? झोपड्यामधी आपल्या धान्याची पोतीच भरून ठेवल्याली आहेत जणू. हातावर पोट आहे विसरू नका.'

'हे बघ सखू सध्या सुगी चालू आहे. त्याला कुठं ही कामाला माणूस मिळणार नाही. आणि इतर वेळेला आपण जाऊ दुसऱ्यांच्या शेतावर. असं सहन करत बसलं तर जास्त माजल तो किसन पाटील.'

'बायांना त्रास होतो ना मग आपण बायांनीच पुढाकार घ्यायचा. बघ बाप्येगडी पण येतात आपल्याबरोबर. किसन पाटलाला आपण बजवायचं मजुरी कापायची नाही – दमदाटी करायची नाही.'

'आणि बायांशी नीट वागायचं... नाहीतर आम्ही कामाला येत नाही. त्याला नांगरावर काम कसं करायचं आहे का माहीत?

'ट्रॅक्टर घेऊन गावभर हिंडायचंच काम त्याचं!

'खरं तर आपली पण युनियन हवी.'

'नर्मदाच्या नर्स भाचीनं सांगितल्यापासून हिनं हे वेड घेतलंय.'

'वेड घेतलंय म्हणे? खरं हाय म्हणून पहा त्यांची युनियन आहे तर बाळंतपणाची रजा, पगारी रजा, सुट्ट्या केवढं मिळतं, अन् आपलं बघा. तूच गेली होतीस ना ५ दिवसाची ओली बाळंतीण असताना कामावर? मग म्हणे युनियनचं वेड! रजा मिळालं नाही मिळलं पण किसन पाटलासारख्याची मग्रुरी तरी कमी करू.'

'खरं आहे बाई तुझं. आपण गड्यांनाही विचारू दम भरल्याशिवाय किसन पाटील सरळ होणार नाही. हातावरचं पोट असणाऱ्यांनी आता बोलल्याशिवाय त्यांना पोटभर अन्न मिळणार नाही.'

'हं आपण साऱ्यांनी एक व्हायचं. गरीब गरीब एकमेकाच्या उरावर बसले तर आपलं अन्न हिस्कून घेणाऱ्यांशी भांडायचं कुणी?'

'चल सारजा तुझं गाणं म्हण बघू. अन् मग निघू साऱ्याजणी.'

'चल ग हिरा, चल ग मिरा, चल ग बायजाबाई
मागं काही नाही आता तटुनी उभी राही. – □

